# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 02/04/2021 (शुक्रवार)

(सायंकाळ)

---

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावर मौजा भानेगाव नवीन बिना येथे दिनांक 24/03/2021 चे 09.00 वा. दरम्यान राजकुमार सदाशिव निकोसे(मृतक) वय 55 वर्ष, रा. भानेगाव नवीन बिना यांना श्वास घेण्याचा त्रास होत असल्याने त्यांना उपचाराकरीता प्रथम पी एच सी चिचोली येथे नेले असता डॉक्टरांनी कोव्हीड 19 ची तपासणी केली असता तो पॉजिटिव आला. त्यामुळे मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर केल्याने त्यास तेथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि 24/03/2021 चे सांयकाळी 05.30 वा च्या सुमारास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. संबधीत कागदपत्र पो. स्टे. खापरखेडा येथे प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. मंदा राजकुमार निकोसे वय 43 रा. भानेगाव नवीन बिना यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक रेवतकर हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत मौजा धान्य गोडाउन तहसील कार्यालयाचे मागे कळमेश्वर येथे वंसतराव वासुदेव रिठे(मृतक) वय 42 वर्षे रा. ब्राम्हणी फाटा इंदीरा नगर झोपडपटटी कळमेश्वर हे दि 27/03/2021 रोजी 10.30 वा. सुमारास आपल्या मोटरसायकलने जात होते. त्यादरम्यान ते मोटरसायकल वरून खाली पडल्याने त्यांच्या पोटाच्या खाली लोखंडी सळाख लागली. त्यातुळे ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरिता प्रथम लता मंगेशकर हॉस्पीटल डिगडोह व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता उपचारादरम्यान दिनांक 30/03/2021 चे 12.30 वा. सुमारास ते मरण पावले. मृतक हे कोव्हीड 19 पॉझिटिव्ह होते. पो. स्टे. कळमेश्वरला मेडीकलचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा राजेश माकडे मेडीकल पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोशि श्री गणेश डेगे मो.नं 9653127873 हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर